अपिलार्थी यांनी दि.०९.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०१.२०२४ | सन २०१४-१५ ते २०२२-२३ या कालावधीतील श्री. एस.जि. रोकडे कृषि अधिकारी यांनी वरील कालावधीत विभागाअंतर्गत केलेल्या कामाची माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विस्तृत, मोघम व व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज

व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---7579--- दिनांक :--09/08/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८०२४/२०२४ व ८०२५/२०२४**
**बोर्ड क्र.१३ व १४**

श्री. सुदाम शामराव गाडेकर, — अपिलार्थी
रा. भिगळखेडा, ता. भोकरदन, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
जिल्हा अधिक्षक कृषिअ धिकारी कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी, : उत्तरवादी क्र.२
जिल्हा अधिक्षक कृषिअ धिकारी कार्यालय, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०२.२०२४ | सन २०२३-२४ या कालावधीतील प्राधनमंत्री पिक विमा २०२३-२४ युनिव्हर्सल सोम्पो जनरला इ.क.ने पावसासह झालेल्या भोकरदन तालुक्यातील कापूस, सोयाबीन, मका, मुग, उडिद पिकाचे भोकदन तालुक्यातील सर्व नुकसानीचे गावनिहाय व इतर.. |
| २०.०२.२०२४ | सन २०२२-२३ या खरीप रब्बी कृषी विभाग व विमा प्रतिनिधी यांनी नुकसान झालेल्या रब्बी व खरिप पंचनामे व स्थळ पाहणी इ... |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे संबंधितास अवलोकन करुन माहिती हस्तगत करावी असे कळविले होते. तथापि अपिलार्थी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती भोकरदन कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे कलम ६(३) नुसार दि.०४.०३.२०२४रोजी वर्ग करुन त्याची प्रत अपिलार्थीस पाठविलेली होती. तसेच भोकरदन तालुक्यात ७५०० शेतकरी आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7580 दिनांक : 09/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ९५३२/२०२४**
**बोर्ड क्र.१५**

श्री. कैलास भिमराव रगडे, — अपिलार्थी
रा. म्हसला, पो. खामगाव (गुरव),
व्हाया राजूर, ता. बदनापूर, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कृषि उपसंचालक,
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०७.२०२४ | मी विमा मिळण्यासाठी मा.कृषी अधिक्षक साहेब यांच्या कार्यालयात दि.०३.०६.२०२४ ला सहा पानासह अर्ज दिला होता त्याचे काहीच न कळाल्यामुळे पुन्हा दि.०२.०७.२०२४ अर्ज दिला आहे. तरी सदर दि.०३.०६.२०२४ हा दि.०२.०७.२०२४ अर्जावरती कोणकोणत्या अधिकाऱ्याकडे तो अर्ज गेला व त्यांना किती त्या अर्जावर कारवाई करणे गरजेचे होते ते सर्व अ र्ज सादर केल्यापासून ते आज रोजी माहिती मिळेपर्यंत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जी कार्यालयात उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना दि.०६.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 7581 दिनांक : 09/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०९५६/२०२४**
**बोर्ड क्र.१६**

श्री. भारत आसाराम फुलारे, — अपिलार्थी
रा. गट नं ५२/१, लक्ष्मीनगर, वडगाव को,
छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वैद्यकिय अधिक्षक,
ग्रामीण रुग्णालय, परतूर, जि. जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी दोघांच्या वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०९.१०.२०२३ ऑनलाईन | दि.०१ एप्रिल २०१६ ते ०८.१०.२०२३ या कालावधीतील आपल्या कार्यालयाच्या अखत्यारीतील ग्रामीण रुग्णालय, परतूर तालुका परतूर जिल्हा जालना येथे कार्यरत कर्मचारी अधिकारी यांची यादी देऊन त्यांच्या पैकी प्रवास भत्ता तसेच इतर भत्ते घेणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांची यदी देऊन सदर लाभ घेताना त्यांनी दाखल केलेले दस्त आयवज यांच्या प्रमाणित प्रती देण्यात याव्या. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी दोघांच्या वतीने प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उशिराने दिलेली आहे. अपिलार्थी हे वर्षी बदल करुन सारखीच माहिती मागतात. त्यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे युक्तिवादात नमूद करतात तथापि अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगाच्या पटलावर सादर केलेले नाही. अपिलार्थी यांनी लेखी खुलासा सादर केले आहे. त्यांचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या लेखी युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, परतूर, जि. जालना यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 7882 दिनांक :- 09/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ९६२/२०२४ ते ९६७/२०२४-६**
**बोर्ड क्र.१७ ते २२**

श्री. भारत आसाराम फुलारे, — अपिलार्थी
रा. गट नं.५२/१, लक्ष्मीनगर वडगाव को. छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रशासकीय अधिकारी, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णायल, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये सहा द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी दोघांच्या वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०७.२०२३ | दि.०१ एप्रिल २०१३ ते दि.०९.१०.२०२३ या कालावधीतील आपल्या कार्यालयाच्या अखत्यारीतील जिल्हा एड्स प्रतिबंधक कार्यालय येथे कार्यरत असलेले जिल्हा पर्यवेक्षक, डी एस, तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी, डीपीओ यांनी त्यांच्या अखत्यारीतील आय सी टी सी एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र यांना दिलेल्या भेटी व इतर.. |
| १०.१०.२०२३ | दि.०१ एप्रिल २०१३ ते दि.०९.१०.२०२३ या कालावधीतील आपल्या कार्यालयाच्या अखत्यारीतील जिल्हा एड्स प्रतिबंधक कार्यालय (डा.प.कु.) जालना अंतर्गत कार्यरत एकूण कर्मचारी अधिकारी यांची यादी देऊन त्यांनी घेतलेल्या एकूण किरकोळ तसेच वैद्यकीय रजा यांची माहिती व इतर.. |

| | |
|---|---|
| १०.१०.२०२३ | दि.०१ एप्रिल २०१३ ते दि.०९.१०.२०२३ या कालावधीतील आपल्या कार्यालयच्या अखत्यारीतील जिल्हा एड्स प्रतिबंध कार्यालय येथे कार्यरत असलेले जिल्हा पर्यवेक्षे, (डी.एस.) तसेच जिल्हा कार्यक्रम अधिकारी (डी.पी.ओ.) यांनी केलेल्या दैनंदिन कामकाजाच्या अहवाल देऊन त्यांच्यावर सोपवलेल्या जबाबदाऱ्या तसेच त्यांची शैक्षणिक अर्हता तसेच नियुक्ती वेळी त्यांनी दाखल केलेले दस्त यांच्या प्रमाणित प्रती देण्यात याव्यात. |
| १०.१०.२०२३ | दि.०१ एप्रिल २०१३ ते ०९.१०.२०२३ या कालावधीतील आपल्या कार्यालयाच्या अखत्यारीतील जिल्हा एड्स प्रतिबंधक कार्यालय तसेच डा प कु अंतर्गत असलेल्या कर्मचारी अधिकारी यांनी घेतलेला एकूण प्रवास भत्ता तसेच इतर लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची यादी देऊन सदर लाभा घेताने त्यांनी दाखल केलेले दस्त आयवत यांच्या प्रमाणित प्रती देऊन सदर लाभ घेण्याचे निकष देण्यात यावे. तसेच लाभा घेण्या अभावी परत गेलेला निधी व सदर लाभसाठी आलेला एकूण निधी याची माहिती देण्यात यावी. |
| १०.१०.१०२३ | दि.०१ एप्रिल २०१३ ते ०९.१०.२०२३ या कालावधीतील आपल्या कार्यालयाच्या अखत्यारीतील जिल्हा एड्स प्रतिबंधक कार्यालय तसेच डा प कु अंतर्गत असलेल्या कर्मचारी अधिकारी यांनी घेतलेला एकूण प्रवास भत्ता तसेच इतर लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची यादी देऊन सदर लाभ घेताने त्यांनी दाखल केलेले दस्त आयवत यांच्या प्रमाणित प्रती देऊन सदर लाभ घेण्याचे निकष देण्यात यावे. तसेच लाभा घेण्याअभावी परत गेलेला निधी व सदर लाभसाठी आलेले एकूण निधी याची माहिती देण्यात यावी. |
| १०.१०.२०२३ | दि.०१ एप्रिल २०१३ ते ०९.१०.२०२३ या कालावधीतील आपल्या कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी अधिकारी यांची यादी देऊन त्यांनी घेतलेले एच आर ए व प्रवास भत्ता यांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची यादी देऊन सदर लाभ घेताने त्यांनी दाखल केलेले दस्त आयवज यांच्या प्रमाणित प्रती देण्यात याव्या तसेच सदर लाभ घेण्याचे निकष देण्यात यावे. |
| १०.१०.२०२३ | दि.०१ एप्रिल २०१३ ते ०९.१०.२०२३ या कालावधीतील आपल्या कार्यालयाच्या अखत्यारीतील जिल्हा एड्स प्रतिबंधक कार्यालय सतेच डा प कु अंतर्गत असलेल्या आय.सी.टी.सी. एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र यांच्या मासिक बैठकासाठी तसेच इतर किरकोळ खर्च व साहित्य यासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था तसेच शासनाकडून आलेला एकूण निधी व त्याचा विनियोग व सदर विनियोगाची बिले देण्यात यावी व सदर विनियोगाचे निकष देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी हे वारंवार विविध प्राधिकरणाकडे माहितीचे अर्ज करतात. प्रति वर्षाला २० ते ३० अर्ज प्रत्येक प्राधिकरणाकडे सध्या उपलब्ध असल्याचे अवगत केलेले आहे. अपिलार्थी हे वेळोवेळी अपिल अर्ज केल्यामुळे प्रशासनाचा वेळ जातो तसेच चिकित्सालयीन / वैद्यकिय कामकाजावर विपरीत परिणाम होतो. अपिलार्थी यांना माहिती संकलीत करुन विलंबाने पाठविलेली आहे. नोदंणीकृत टपालाने पाठविल्याचे पोस्टाची पावती आयोगास सादर करित आहे. कार्यालयीन कामामुळे अपिलार्थीस माहिती पाठविण्यास विलंब झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज लेखी निवदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहेत. त्यात त्यांन असे नमूद केले की, माहिती पासून वंचीत ठेवल्याने नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन जन माहिती अधिकारी यांने अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात व लेखी युक्तिवादात नमूद बाबी विचारात घेता, त्यात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे सहा द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे सहा द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-7583- दिनांक :-09/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३३२७/२०२३**
**बोर्ड क्र.२३**

श्रीमती गोदावरी गोरखनाथ कदम, — अपिलार्थी
रा. सोन्ना, ता. पुर्णा, जि. परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
तहसिल कार्यालय, पुर्णा, जि. परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, पुर्णा, जि. परभणी

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तहसिलदार, तहसिल कार्यालय, पुर्णा, जि. परभणी

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०५.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ऑनलाईन | १. पिंपळगाव (लिखा) व सोन्ना ता. पुर्णा गावामधील आपल्या कार्यालयातर्फे हटविण्यात आलेले ग्रामीण हद्दीत अतिक्रमण महाराष्ट्र शासनाच्या कोणत्या परिपत्रक नुसार हलविले आहे.<br>२. सदर अतिक्रमण काढण्यासाठी देण्यात आलेल्या आदेशाची प्रत.<br>३. सदर अतिक्रमण हटविण्याची मागणी करण्यात आलेल्या विनंतीची प्रत.<br>४. सदर अतिक्रमण हटविण्यासाठी मोजणी करण्यात आली आहे का, असल्यास मोजणी अहवाल व अतिक्रमण झालेल्या मोजणीचा नकाशा.<br>५. अतिक्रमण हटविण्यासाठी लगतच्या भूधारकास बजावण्यात आलेल्या नोटीस |

| | |
|---|---|
| | प्रत.<br>६. अतिक्रमण काढण्यासाठी शासनाकडून किती निधी खर्च झाला आहे.<br>७. सदर अतिक्रमण महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक भूमापन-१०८६/६/४९६६ ल-१ मध्ये नमूद कोणत्या प्रकारातील रस्त्यावर झाले होते. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, विहित मुदतीत माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी विस्तृत, मोघम व व्यापक स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अंतः आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-7584 दिनांक :- 09/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्रराज्य, खंडपीठछत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०६४९/२०२४ ते ६५८, ६२४८ व ६२५८/२०२४ एकूण-१२**
**बोर्ड क्र.२४ ते ३५**

श्री. शिवभुषण लक्ष्मणराव जाधव, — अपिलार्थी
रा. पाटील गल्ली, ता. पाटोदा, जि. बीड-४१४२०४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर पंचायत कार्यालय, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकूण बारा द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय / तपशिल |
|---|---|---|---|
| २४ | ६४९/२०२४ | ०९.०८.२०२३ | सन २०१७ ते मार्च २०२३ या कालावधीतील नगरपंचायत पाटोदामध्ये राबवल्या गेलेल्या contructions work of Krantinager dranej system form PR-१५ अमाउंट = ७४,९०,३००/- या केलेल्या कामाची खालीलप्रमाणे माहिती, सदर कामाजचा जी बी ठराव, अंदाजपत्रक, technical sanctions, प्रशासकीय मान्यता, जाहिरात, एकूण आलेले टेंडर, पात्र एजन्सीचे कागदपत्रे, सदर एजन्सीने भरलेले डीपोजीट,वर्क ऑर्डर, मोजमाप पुस्तिका, टेस्ट |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | रिपोर्ट, थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट आणि दिले गेलेल्या पेमेंटची टिपणी सहित माहिती |
| २५ | ६५०२०२४ | ०९.०८.२०२३ | २०१७ ते मार्च २०२३ या कालावधीतील नगरपंचायत पाटोदामध्ये राबवल्या गेलेल्या contructions of CC road & gadeker wasti अमाउंट = १९,७६,६७३/- समर्थ contructions मार्फत केलेल्या कामाची माहिती व इतर |
| २६ | ६५१/२०२४ | ०९.०८.२०२३ | डिसेंबर २०१८ ते मार्च २०२३ या कालावधीतील नगरपंचायत पाटोदामध्ये राबवल्या गेलेल्या contructions of CC road & drain form pvp college to little flower Englisg school अमाउंट = ४४.९७.५५८/- दलित वस्ती सुधार योजना या कामाची माहिती व इतर |
| २७ | ६५२/२०२४ | ०९.०८.२०२३ | २०१७ ते मार्च २०२३ या कालावधीतील नगरपंचायत पाटोदामध्ये राबवल्या गेलेल्या contructions of extension of pipeline अमाउंट = २७,१५,०००/- भामेश्वर मजूर संस्था (१५ वा वित्त आयोग) मार्फत केलेल्या कामाची माहिती व इतर |
| २८ | ६५३/२०२४ | ०९.०८.२०२३ | सन २०१७ ते मार्च २०२३ या कालावधीतील नगरपंचायत पाटोदा मध्ये राबवल्या गेलेल्या constructions of other facilities in crematiorium (स्मशानभूमी हिंदू), अमाउंट =२५,२७,६५५/- भामेश्वर इन्फ्रा प्रा.लि.मार्फत केलेल्या कामाची माहिती व इतर |
| २९ | ६५४/२०२४ | ०९.०८.२०२३ | २०१७ ते मार्च २०२३ या कालावधीती नगरपंचायत पाटोदा मध्ये राबवल्या गेलेल्या constructions work of development at Hindu Smashanbhumi अमाउंट = ०९,९९,१५०/- जगदंब मजूर सहकारी संस्था मार्फत केलेल्या कामाची माहिती व इतर.. |
| ३० | ६५५/२०२४ | ०९.०८.२०३ | २०१७ ते मार्च २०२३ या कालावधीती नगरपंचायत पाटोदा मध्ये राबवल्या गेलेल्याconstructions of proposed lying of pevhing blocat प्रभाग ८ अमाउंट १०,००,०००/- (१४वा वित्त आयोग) केलेल्या कामाची माहिती व इतर.. |
| ३१ | ६५६/२०२४ | ०९.०८.२०२३ | २०१७ ते मार्च २०२३ या कालावधीतील नगरपंचायत पाटोदा मध्ये राबवल्या गेलेल्या contructions of road राज मोहम्मद चौक ते मुस्लीम मोहल्ला ते अजित किराणा अमाउंट =४९,८२,०१४/- दलित वस्ती सुधार योजना भामेश्वर इन्फ्रा प्रा.जि. मार्फत केलेल्या कामाची माहिती व इतर.. |
| ३२ | ६५७/२०२४ | ०९.०८.२०२३ | २०१७ ते मार्च २०२३ या कालावधीतील नगरपंचायत पाटोदा मध्ये राबवल्या गेलेल्या constructions work |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | of solid waste management १० No-S अमाउंट = ४६,६४.१६७/- केलेल्या कामाची माहिती व इतर.. |
| ३३ | ६५८/२०२४ | ०९.०८.२०२३ | सन २०१७ते मार्च २०२३ या कालावधीतील नगर पंचायत पाटोदाच्या मार्च २०१६ ते मार्च २०२३ पर्यंत झालेल्या जनरल बॉडी मिटिंग प्रोसिडींगच्या साक्षांकित प्रती व यानंतर सुध्दा मिटिंग झाली असल्यास त्याची झेरॉक्स सत्यप्रतीत माहिती |
| ३४ | ६२४८/२०२४ | २४.०१.२०२४ | मार्च २०१५ ते डिसेंबर २०२३ या पर्यंत नगर पंचायत कार्यालयाने प्लॉट गुंठेवारीच्या संदर्भाने कार्यालयाकडे आलेल्या अर्जाची नावासहित माहिती व इतर.. |
| ३५ | ६२६८/२०२४ | २४.०१.२०२४ | सन मार्च २०१५ ते डिसेंबर २०२३ पर्यंत नगर पंचायत पाटोदा यांच्याकडे पंचायत पाटोदा अंतर्गत १. प्राथमिक ले-आऊटसाठी आलेल्या अर्जाची माहिती २. प्राथमिक ले-आऊटसाठी आलेल्या माहिती व या संदर्भाने ले-आऊट मंजूरीकरिता दाखल केलेल्या प्रस्तावाची साक्षांकित झेरॉक्स स्वरुपात माहिती व इतर. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, उपरोक्त बहुतांश माहिती अधिकार अधिनियम,२००५ अन्वये अपिलार्थी यांनी नगर पंचायत मार्फत केलेल्या सर्व कामांची जी.बी.ठराव, अंदाजपत्रक, technical sanctions, प्रशासकीय मान्यता, जाहिरात, एकूण आलेले टेंडर, पात्र एजन्सीचे कागदपत्रे, सदर एजन्सीने भरलेले डीपॉजीट,वर्क ऑर्डर, मोजमाप पुस्तिका, टेस्ट रिपोर्ट, थर्ड पार्टी ऑडीट रिपोर्ट आणि दिले गेलेल्या पेमेंटची टिपणी सहित अशी माहिती मागितलेली आहे.

२. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्याचे आदेशीत करुनही माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम व विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

३. प्रस्तुत प्रकरणात आयोगासमोर झालेला युक्तिवाद व अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी एकाच विषयाची वेगवेगळया प्राधिकरणाकडे एक सारखीच माहिती अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेले आहेत. या परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांना सर्व अर्जाना ३० दिवसात मुदतीत प्रतिसाद देताना त्याचा शासकीय कामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा सर्रास दुरुपयोग करीत असून त्या आधारे विविध शासकीय प्राधिकरणाकडे दहशत निर्माण करणे हा त्यांचा हेतू आहे. त्यामुळे प्राधिकरणाच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम झाला असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमक्ष सांगितले.

४. माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने आवश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच

शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतुद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामाकाज सुसुत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

५. प्रस्तुत प्रकरणातील सर्व माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी एक सारखीच माहिती वेगवेगळया प्राधिकरणाकडे मागितलेली आहे. मागणी केलेल्या अशा माहितीचा कालावधी मोठा आहे. विस्तृत व्यापक व मोठया कालावधीची माहिती मागितलेली आहे. या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी त्या त्या प्राधिकरणाकडे सादर केलेल्या बहुतांश सर्व प्रथम अपिलामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अपिल कर्त्याला वेळेवर माहिती दिली नाही, म्हणून अपिल दाखल करण्यात येत आहे, असे प्रयोजन नमूद केलेले आहे. यावरुन असे निदर्शनास येते की, संबंधीत अर्जदार यांनी संबंधीत प्राधिकरणाकडे नियम ३ व १९ (१) अन्वये अर्ज सादर न करता सदर अर्जाच्या छायांकित प्रती खंडपीठाकडे सादर करुन द्वितीय अपील दाखल केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अपिलार्थी यांच्या अशा प्रवृत्तीमुळे शासन स्तरावर विपरीत परिणाम होतो. संबंधीत माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी गरज नसताना क्षेत्रीय कार्यालय खंडपीठासमोर सुनावणीस उपस्थित राहावे लागते. सदर बाब प्रशासकीय दृष्टीकोनातून योग्य नाही.

६. माहिती कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा आहे. वारंवार एकाच विषयावर वेगवेगळया प्राधिकरणाकडे माहिती अर्ज करुन शासकीय यंत्रणेस वेठीस धरण्याचा अपिलार्थी यांचा हेतू असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे शासकीम कामात अडथळा निर्माण होतो. तसेच शासकीय कामाकाजावरही विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो.

७. आयोगाने या प्रकरणी निर्णयाप्रत येताना, मा. सर्वोच्च न्यायालय, केंद्रीय माहिती आयोग, यांनी विविध प्रकरणात दिलेले न्यायनिवाडे, अधिनियमाची प्रस्तावना, अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे युक्तिवाद, त्यांनी सादर केलेले व प्रकरणात उपलब्ध असलेले अभिलेखे इत्यादी खाली नमूद केलेल्या बाबी विचारात घेतल्या आहेत.

(१). माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन अपिलार्थी यांनी वेगवेगळया सार्वजनिक प्राधिकरणाकडे सादर केलेले माहिती अर्ज, प्रथम अपिले व राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेली द्वितीय अपीले यासाठी, हेतुत: अवलंबलेली कार्यपध्दती याची पडताळणी अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमूद तत्वांशी करण्यात आली. या अधिनियमाच्या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत. "

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नगारिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतुद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती

अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

(२). मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दिनांक ०९.०८.२०११ रोजी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where ७५ % of the staff of public authorities spend ७५ % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties.

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

(३). मा.उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being nay useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

(४). केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/२०१२/०००८५८-SA ते ०००८७२-SA संदर्भात दिनांक ०४.०७.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

**Earlier Observation of CIC : Shri.M.M.Ansari**

In several occasions earlier the central information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar V NFL, Panipat, (Decision No.२४६/IC(A)२००६, F.No.CIC/MA/A/२००६/००३७४ & ३७५ dated २८ Auguest २००६) the applicant sought documents and specific comments of CPIO on ८९ queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of self-interest, rather than public interest, was dominant, as the appellant had sought redressed of grievances.

(५). तसेच तत्कालीन केंद्रिय माहिती आयुक्त मा.शैलेश गांधी यांनी No.CIC/SG/C/2011/000760, CIC/SM/2011/ 000926/ SG, CIC/SM/A/2011/001111/SG, CIC/SM/A/2011/002909, dated 17 th January, 2012) नमूद केले आहे की, अपिलार्थी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उपयोग कायदेशीर हत्यार म्हणून करीत आहे. जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे. याबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information Commissioner

Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/SG/C/२०११/०००७६०, CIC/SM/२०११/ ०००९२६/ SG, CIC/SM/A/२०११/००११११/SG, CIC/SM/A/२०११/००२९०९, dated १७ th January, २०१२) in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information..... At this juncture the **Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, It cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual.** In the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him....**The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission, is wasting public resources.**" तसेच नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांच्या अंतस्थ व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

८. प्रस्तुत अपील प्रकरणी निर्णयाप्रत येण्याच्या प्रक्रियेपुर्वी उपरोक्त वर परिच्छेद क्रमांक ५ मध्ये नमूद बाबी विचारात घेण्यात येत आहेत.

१) माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी, असा या कायद्याचा मुख्य हेतु आहे. तथापि अपिलार्थी यांनी विपरीत भूमिका घेऊन माहिती अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याचा दुरुपयोग करण्यासाठी सुनियोजित पध्दतीने अनेक सार्वजनिक प्राधिकरणांकडे जाणीवर्पुक अतिविस्तृत, दिर्घकालावधीची, मोघम स्वरुपाच्या माहितीची मागणी करण्यासाठी मोठया संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले व त्या अनुषंगाने मोठया संख्येने आयोगाकडे द्वितीय अपीले सादर केली आहेत.

२) अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ चा वापर करुन मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपिले आणि द्वितीय अपीले सादर करण्याच्या या कृतीशी कोणते व्यापक जनहित निगडित आहे हे नमूद केलेले नाही. याबाबत तसेच अपिलार्थी सुनवणीसाठी उपस्थित राहिले नाहीत.

३) अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा (माहिती अधिकार) माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक असूनही, त्यांनी माहिती अधिकार कायद्याचा जाणीवपुर्वक अनिर्बंध व अवाजवी दुरुपयोग केला आहे.

४) अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी वापर केला असल्याने संबंधित शासकीय कार्यालये/ प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ, साधनसामग्री व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडून सदर शासकीय कार्यालयाकडून सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या दैनंदिन शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

५) अशा मोठया प्रमाणावर अर्ज करण्याच्या कार्यपध्दतीमुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोधक निर्माण होत आहे. त्याचा निश्चितपणे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व मा. केंद्रीय माहिती आयोगाकडील अशा प्रकरणी वेळोवेळी दिलेले, ऐतिहासिक, क्रांतीकारी व लक्ष्यवेधी निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नाही. वारंवार मोठया प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील

मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होत आहे. तसेच संबंधित शासकीय विभागाचा / प्राधिकरणांचा बहुमूल्य वेळ वाया जात असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे. ही बाब माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. म्हणून अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपिलांमध्ये कोणतेही तथ्य किंवा गुणवत्ता आढळून येत नसल्यामुळे व त्यातून कोणतेही जनहित साध्य होत नसल्यामुळे सर्व १२ द्वितीय अपिले कोणत्याही निर्देशाविना फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपिलार्थी यांची आरा व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहे.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांना निर्देशित करण्यात येते की, प्रस्तुत आदेशाची जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा बीड यांचेमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. तसेच सदर आदेश आपल्या अधिनस्त कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात यावा.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7585 दिनांक : 09/07/2025

प्रत : माहितीसाठी तथा यथाशिघ्र कार्यवाहीसाठी प्राधिकृत करण्यात येत आहे
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११८६/२०२४ ते ११८८/२०२४ एकूण३**
**बोर्ड क्र.३६ ते ३८**

श्री. विशाल बाबासाहेब गर्जे, — अपिलार्थी
रा. माऊलीनगर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर पंचायत समिती कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०९.२०२३ | सन २०१६ ते २०२३ पर्यंत नगरपंचायत अंतर्गत झालेल्या एकूण सर्व गुंठेवारी यांची अनुक्रमाने नावेनिहाय यादीचा तपशील मिळणेबाबत व इतर दोन मुद्द्याबाबत ... |
| २७.०९.२०३ | नगर पंचायत अंतर्गत सन ०१.०१.२०२२ ते दि.२५.०९.२०२२ मधील चालू सर्व कामांची ESTIMATES, WORK OREDER, TENDER (BIDERS LIST)इत्यादीची माहिती व इतर .. |
| २२.०६.२०२३ | ता. पाटोदा नगरपंचायत अंतर्गत सन २०१३-१४ ते सन २०२३ पर्यंत एकूण किती कामाच्या वर्क ऑर्डर याची वर्क ऑर्डर नुसार माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, काही प्रकरणात: अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली आहे. तसेच अपिलार्थी यांचे प्रत्येक विभागाकडे ४५ ते ५० किंवा त्यापेक्षा जास्त माहितीचे अर्ज प्राप्त आहेत. अपिलार्थी यांनी मोघम व्यापक माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी हे माहिती अधिकार अधिनियम, २००५ या कायदयाचा दुरुपयोग करित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी व्यापक व मोठया कालावधीची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7586 दिनांक : 09/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११८९/२०२४**
**बोर्ड क्र.३९**

श्री. विशाल बाबासाहेब गर्जे, — अपिलार्थी
रा. माउलीनगर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यायल, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.१०.२०२३ | आपल्या कार्यालयाला दि.०१.०१.२०२० ते दि.२७.१०.२०२३ पर्यंत खरीप व रब्बी हंगामाचे बियाणे आलेल्या एकूण सर्व बियाण्याची वजन निहाय व बियाण्याचे नाव निहाय यादीव इतर.. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अद्याप मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी व्यापक, मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती

अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय निकाल काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---7589--------- दिनांक :-09/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८३९५/२०२४**
**बोर्ड क्र.४०**

श्री. शेख मोबीन शेख हमीद, — अपिलार्थी
मु. पो. क्रांतीनगर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर पंचायत कार्यालय, पाटोदा, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर पंचायत पाटोदा, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०५.२०२४ | नगर पंचायत कार्यालयाअंतर्गत आज रोजी प्रभाग क्र.०१ मध्ये हॉटेल यश पॅलेस शेजारी चालू असलेल्या कामाची माहिती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना दि.१२.०५.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे. ती पोहच आयोगाच्या पटलावर सादर केले.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.- 7590 दिनांक :- 09/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८६०७, ७०५१ व ९९७७/२०२४**
**बोर्ड क्र.४१ ते ४३**

श्री. इनामदार निजाम हयातोद्दीन, — अपिलार्थी
रा. रोजा मोहल्ला, केज, ता.केज, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर रचना प्रमुख,
नगर पंचायत कार्यालय, केज, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत केज, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०५.२०२४ | गुंठेवारी केलेले तपशील मिळणेबाबत, दि.०१.०१.२०२० ते १७.०५.२०२४ पर्यंत आपल्या कार्यालयात दाखल केलेले प्रस्तावाची संचीकाची सत्यप्रत व गुंठेवारीसाठी पैसे भरलेले पावतीची सत्यप्रत व गुंठेवारी केल्याची सत्यप्रत देण्यात यावे. |
| २५.०१.२०२४ | दि.०१.०९.२०१७ ते आजपर्यंत २५.०१.२०२४ नगर पंचायत फंड विविध योजनेच्या खात्यातून दिलेले चेक नावासहित यादी देणे. |
| २५.०१.२०२४ | दि.०१.०९.२०१७ ते आजपर्यंत २५.०१.२०२४ नगर पंचायत फंड व विविध योजनेच्या खात्यातून दिलेले चेक नावासहित यादी देणे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन

माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली होती. तथापि अपिलार्थी त्या पत्यावर राहत नसल्यामुळे पाठविलेली माहिती परत आलेली आहे. जवळ पास ६०० ते ७०० पृष्ठांची माहिती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुदतीत माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नगर रचना प्रमुख,नगर पंचायत कार्यालय, केज, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहिती आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. मुख्याधिकारी, मुख्याधिकारी, नगर पंचायत केज, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीनही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7591 दिनांक : 09/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०९८०/२०२४**
**बोर्ड क्र.४४**

ॲड. जुनेद अहेमद फारुखी, — अपिलार्थी
रा. जे.के. फंक्शन हॉल जवळ, तालूका केज, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर पंचायत कार्यालय, केज, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, केज, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०९२०२४ | कळंब रोड ते एल एफ सी चौक आणि एल एफ सी चौक ते खव्वा भट्टी तसेच खव्वा भट्टी ते मोहसीन ईनामदार यांचे विटभट्टी पर्यंत ०१ ते १५कि.मी. लांबीचा सिमेंट रास्ता ज्या कपंनी द्वारे बांधण्यात आला आहे या रस्त्याचे दोन्ही बाजूने सिमेंट नाला बांधण्यात आला व इतर .. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. तसेच मागणी केलेली माहिती ही आमच्या कार्यालयाशी संबंधीत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये,

कसल्याही प्रकारचे निर्णय व कारवाई केलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती अर्ज या कार्यालयाशी संबंधित नसल्याचे अवगत केलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी संबंधित असल्यास असा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) नुसार जास्तीत जास्त पाच दिवसाच्या मुदतीत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार सुसंगत हस्तांतरण झाले नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांना आता कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर पंचायत कार्यालय, केज, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहिती ज्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती त्या कार्यालयाकडुन अधिनियमातील कलम ५ (४) नुसार संकलित / एकत्रित करुन अशी माहिती अपिलार्थी यांना, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर पंचायत, केज, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रि.इं.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7593 दिनांक : 09/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक १५१६/२०२४ ते १५१८/२०२४-३**
**बोर्ड क्र.४५ ते ४७**

श्री. आकाश महादेव जाधव, अपिलार्थी
रा. सज्जनगड कॉलनी, नखातेवस्ती रहाटणी, पुणे-४११ ०१७

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद माजलगांव, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन व्दितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ऑनलाईन | नोंदणी कायद्यान्वये नोंदणी झालेल्या सर्व विवाहाची माहिती/ यादी पुढीलप्रमाणे देण्यात यावी, १. नोंदणीकृत पती आणि पत्नी पूर्ण नाव २. विवाह नोंदणी तारीख ३. विवाह नोंदणी क्रमांक ४. विवाह दिनांक. |
| ऑनलाईन | माजलगाव नगरपालिका ता. माजलगांव, जि बीड या आस्थानेअंतर्गत २००३-२००७ या संपूर्ण कालावधीत विवाह नोंदणी कायद्यान्वये नोंदणी झालेल्या सर्व विवाहाची माहिती/यादी पुढील प्रमाणे देण्यात यावी. १. नोंदणीकृत पती आणि पत्नी पूर्ण नाव २. विवाह नोंदणी तारीख ३. विवाह नोंदणी क्रमांक. |
| ऑनलाईन | माजलगांव नगरपालिका ता माजलगांव, जि बीड यांचेकडे पुढील कालावधीमधील नोंदणीकृत जन्म नोंदीची माहिती मिळणेबाबत..कालावधी१.२५.०८.२००८ ते २५.०८.२००९ २. २१.०३.२०१६ ते २१.०३.२०१७ ३. ०५.०१.२०२१ ते ०५.०१.२०२२ इ. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7593 दिनांक : 09/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -४१४९/२०२४ व ८९५०/२०२४**
**बोर्ड क्र.४८ व ५०**

श्री. पठाण नासेर खॉन दौलत खॉन, अपिलार्थी
रा. बुखारी शाळे समोर राजगल्ली,
माजलगांव, ता. माजलगांव, जि. बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, माजलगांव, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२४ व ०९.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलांची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.(तथापि जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी स्वाक्षरीचा रोजनामा सादर केलेला नाही )

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०१.२०२४ | ०१ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या काळात नामत्तर विभाग कोड ७ टक्के वसुल झालेले अंदाजीत ४८० ते ५०० लोक व्यवस्था करीत ७ टक्के वसुली झालेली पावतीची सत्यप्रत देण्यात यावी सदरील काळात ४०० ते ५०० लोकांनी नवीन नाव लावण्यासाठी आपल्याकडे एक टक्का ३ पानी रजीस्ट्रीचे मुल्याकन प्रमाणे दिलेले आहे त्या वस्तीना दिलेली वसुली पावतीची सत्यप्रत देणेबाबत. |
| २६.०७.२०२४ | माजलगांव नगर परिषद हद्दीतील सर्व्हे नंबर १ ते ३६८ ते ३८९ प २९० ते २९२ मधील झालेली गुंठेवारी प्रकरणाची १. जमीन मालकाचे नावेची यादी २. त्यांना दिलेले ३. प्रमाणपत्र ४ गुठेवारी प्रमाणपत्र व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहित मागितलेली आहे. पंधरा दिवसाची मुदत देण्यात यावी अशी आयोगास विनंती केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आजपर्यंत माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलान नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याधिकारी, नगर परिषद, माजलगांव, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ७५९४ दिनांक : 09/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ९९०२/२०२४**
**बोर्ड क्र.५१**

श्री. भगवान किशनराव जोशी, — अपिलार्थी
रा. समर्थनगर, चींचगव्हाण, पो. ता. माजलगांव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, माजलगांव, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०८.२०२४ | बी.के. जोशी यांची पेंन्सनबाबत देय असलेली माहिती गेल्या २००९ ते २०२४ पर्यंत १. रजारोखी करणे व इतर. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, माजलगांव, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी,नगर परिषद, माजलगांव, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7595 दिनांक : 09/07/2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७२९८/२०२४**
**बोर्ड क्र.५२**

श्री. मनोहर चिमाजी चाळक, — अपिलार्थी
रा. शास्त्री चौक रोडच्या पश्चिम बाजूस, नगर परिषद कोर्ट रोडच्या दक्षिण बाजूस गेवराई, ता.गेवराई, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, गेवराई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद गेवराई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०४.२०२४ | दि.२३१२.२०२२ ते आजपर्यंत या कालावधीतील गेवराई नगर परिषद विरुध्द दिलेल्या तक्रारीचा संदर्भ टाकून सहायक आयुक्त नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या मार्फत दिलेल्या प्रत्येक आदेशपत्रावर गेवराई नगर परिषद या कार्यालयामार्फत कार्यवाही करुन जिल्हा प्रशासन कार्यालय बीड या कार्यालयाला सादर केलेल्या अहवालाच्या कागदपत्राच्या प्रती मिळण्याबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि निर्णयाची प्रत दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती

उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अवलोकन देऊन, चिंन्हाकीत केलेली माहिती पोस्टाने पाठविलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी निर्णयाची प्रत दिलेली नाही असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या कारवाईचा कोणताही पुरावा आयोगाच्या पटलावर सादर केलेला नाही. यावरुन अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांचा युक्तिवाद व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, गेवराई, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याधिकारी,नगर परिषद गेवराई, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7596 दिनांक :- 09/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७९०३/२०२४**
**बोर्ड क्र.५३**

श्री. राजेंद्र मधुकर बरके, — अपिलार्थी
रा. लक्ष्मीनगर गल्ली, किल्लेधारुर,
ता. किल्लेधारुर, जि. बीड-४३११२४

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, किल्लेधारुर, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, किल्लेधारुर, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०३.२०२४ | संबंधित कालावधीत २०१६ ते २०२३ पर्यंत राज्य माहिती आयोग खंडपीठ छ. संभाजीनगर (औरंगाबाद) सुनावणी झालेल्या द्वितीय अपिलाच्या निकाल व कलम १८ अंतर्गत तक्रार अर्जाच्या निकालामध्ये संबंधित तत्कालीन न.प. किल्ले धारुर मुख्याधिकारी व सध्या कार्यरत न. प. गेवराई श्री. विशाल भोसले यांच्यावरील शिस्तभंगाची कारवाईची शिफारस झालेल्या प्रकरणाची एकूण संख्या व द्वितीय अपील क्र. व कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज क्र. सहीत माहिती लेखी पुरावयानिशी साक्षांकित करुन मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती देण्यात आलेली नाही. माहिती तयार आहे. अपिलार्थीस देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२१.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती आजपर्यंत मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्याचे आदेशीत केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, किल्लेधारुर, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी,नगर परिषद, किल्लेधारुर, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 7597 दिनांक :- 09/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७९०२/२०२४**
**बोर्ड क्र.५४**

श्री. राजेंद्र मधुकरराव बरके, — अपिलार्थी
रा. लक्ष्मीनगर गल्ली, किल्लेधारुर,
ता. किल्लेधारुर, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
विदयुत विभाग व पाणी पुरवठा विभाग,
नगर परिषद कार्यालय, किल्ले धारुर, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद किल्ले धारुर, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०३.२०२४ | दि.०१ एप्रिल २०१७ ते माहिती मिळपर्यंत आपल्या कार्यालयअंतर्गत असलेल्या न.प. किल्लेधारुर अंतर्गत लक्ष्मीनगर हापसा ज्यास भरपूर पाणी असतानाही नादुरुस्त असलेला दुरुस्त केलेला असेल तर त्याची पुराव्यानिशी लेखी माहिती व दुरस्त केलेला नसेल तर त्याचीही पुराव्यानिशी लेखी माहिती व कधीही दुरुस्त करणार नसाल तर त्याचीही पुराव्यानिशी लेखी माहिती साक्षांकित करुन मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती देण्यात आलेली नाही. माहिती तयार आहे. अपिलार्थीस देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती आजपर्यंत मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्याचे आदेशीत केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा विदयुत विभाग व पाणी पुरवठा विभाग,नगर परिषद कार्यालय, किल्ले धारुर, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याधिकारी,नगर परिषद, किल्लेधारुर, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7598 दिनांक : 09/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २४३१/२०२४**
**बोर्ड क्र.५५**

श्री. शेख वसीम शेख सलीम, — अपिलार्थी
रा. आदर्श नगर, तेलगाव नाका, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर पंचायत कार्यालय, आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत आष्टी, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२१.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.१२.२०२३ | दि.०१ जानेवारी २०१८ ते आपण माहिती देईपर्यंत या कालावधीतील नगर पंचायत कार्यालय, आष्टी, जि. बीड या नगर पंचायतीच्या करण्यात आलेले व होत असलेले लेखापरीक्षण अहवाल (ऑडीट रिपोर्ट) अहवालाची छायांकित प्रत देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, मी सध्या नवीन आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली आहे काय ते पाहून मी अपिलार्थीस माहिती देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर पंचायत कार्यालय, आष्टी, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर पंचायत आष्टी, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7599 दिनांक : 09/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७६१६/२०२४ व ७६१७/२०२४**
**बोर्ड क्र.५६ व ५७**

श्री. संपत शिवाजी सायकड, — अपिलार्थी
मु. पो. आष्टी, ता. आष्टी, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर पंचायत कार्यालय, आष्टी, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर पंचायत आष्टी, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे, त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०३.२०२४ | सन २०२२-२०२३-२०२४ या कालावधीतील आष्टी नगर पंचायत अतंर्गत किती मोबाईल टॉवर आहेत. प्रति वर्ष किती दर जमा झाला व तो कोठे खर्च झाला कोणत्या खाते मध्ये जमा होता बँकचा पुरावेसह चेकचा पुरावेसह देण्यात यावी. |
| १४.०३.२०२३ | सन २०२२ ते २०२४ या कालावधीतील नगर पंचायत अंतर्गत कोणकोणते कर निर्णय व घेण्यात आलेले ठराव हे दर कोणत्या बँड खातेमध्ये जमा करण्यात येते. तसेच पुरावे व कोठे कोठे खर्च करण्यात आले पुरावेसह देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोन्ही माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दि.१३.०६.२०२४ रोजी माहिती दिलेली आहे. तसेच दि.१७.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन केल्यानंतर आवश्यक माहिती पुरविण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देणे, टाळाटाळ करणे, अपुर्ण माहिती देणे व अपिल घेऊन आदेश न देणे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रसतुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी दि.१८.०६.२०२५ रोजी माहिती मिळाली अशी स्वाक्षरी केलेली आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 7600 दिनांक :- 09/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०९७४/२०२४**
**बोर्ड क्र.५८**

श्री. संतोष सुरजमल मुथा, अपिलार्थी
रा. रहेनेवाले- गुरुवारपेठ, अंबाजोगाई, जि. बीड महाराष्ट्र

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३१.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.१०.२०२३ | मौजे ता. अंबाजोगाई येथील जमीन सर्वे नं.५९२ एकूण क्षेत्र ३५ एकर ०२ गुठे ज्यामध्ये अर्जदार व इतर वारसाचे उर्वरीत क्षेत्रफळ २९ एकर २४ गुंठे नकाशा व रिपोर्ट प्रमाणे जमीनीतील दोन नंबर जिल्हा प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (डी ए आय टी) शासकीय अध्यापक विद्यालय इमारत चार नंबर शासकीय ग्रंथालय व शासकीय प्रयोग शाळा इमारत पाच नंबर शासकीय निवासस्थान इमारत सहा नंबर एक व दोन शासकीय निवास्थान इमारत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी मला अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.०३.०१.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे.

अपिलार्थी यांनी ते पत्र स्विकारुन पोहच स्वाक्षरी केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि०२.०१.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे व कुठलाही आदेश मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि०२.०१.२०२४ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद अंबाजोगाई, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8019 दिनांक : 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८९५/२०२४**
**बोर्ड क्र.५९**

श्री. शेख गुलाम मुस्तफा गुलाम दस्तगीर, — अपिलार्थी
रा. शहीशहा नगर मेराज मस्जिद जवळ मोहसीन किराणा स्टोअर्स समोर, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — :उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.१२.२०२३ | घर नंबर ५ ३५९ विकारपेठ अंबाजोगाई (बागवान गल्ली) येथे संडास बांधकामा करिता श्रीराम नरसू शिंपलेरा रविवारपेठ यांनी सन २०१६ साली केले l अर्ज व अर्जासोबत दिलेल्या कागदपत्राची झेरॉक्स प्रत देण्यात यावेत व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती सर्व ऑनलाईन प्रणालीवर उपलब्ध आहे. तथापि प्रिंट काढून दि.१०.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पोस्टाने माहिती पाठविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१०.०३.२०२५ रोजी माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिल प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8020 दिनांक : 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८३२५/२०२४**
**बोर्ड क्र.६०**

श्री. सय्यद खालेक पिता सय्यद यासीन,
रा. भाई गल्ली रविवार पेठ, अंबाजोगाई,
ता. अंबाजोगाई, जि. बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अंबाजोगाई, जि. बीड — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०४.२०२४ | सन २०१५ या कालावधीतील भाई गल्ली रविवारपेठ अंबाजोगाई येथील जागा क्र.५.३१५ पैकी सय्यद बिरादरीचे स्वतंत्र कबरस्तानची नगर परिषद कार्यालयाचे पी.टी.आर का नोंद घेणेबाबत व इतर पाच मुद्याबाबत... |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा क्र०१ व २ च्या अनुषंगाने अपिलार्थीस दि.२६.०६.२०२४ रोजीच्यापत्रान्वये सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे. तसेच मुद्दा क्र३ ते ५ प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे देता येत नाही याबाबत अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांनी ते पत्र स्वीकारुन पोहच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप निर्णय नाही व माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२६.०६.२०२४ रोजी कळविल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8021 दिनांक : 15/01/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०८१०/२०२४**
**बोर्ड क्र.६१**

श्री. नितीन शंकर सरवदे, — अपिलार्थी
रा. भिमनगर परळी वेळस, मांडवा रोड, अंबाजोगाई,
जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अंबाजोगाई, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसमेचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसमे जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०७.२०२४ | पाणी पुरवठा जलनिकास, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, बॉबे टाउन प्लॅनिंग अॅक्ट १९५४ अन्वये नगरपालिकांनी अंगीकारलेल्या विकास योजना व नगररचना योजना, नगरपालिकेचा अधिकारी वर्ग व सेवकवर्ग यांचा महागाई भत्ता, अधिकाऱ्यांचे सामान्य संवर्ग स्थापन झाले, तर त्यातील अधिकाऱ्यांचा पगार, सार्वजनिक आरोग्य, अग्निशमनव्यवस्था, रस्तेबांधणी व दुरुस्ती, राज्य सरकार वेळोवेळी ठरवील ती सुखसोय, सेवकवर्गाला पगाराची शाश्वती मिळावी म्हणून प्रत्येक नगरपालिकेने पगार राखीव निधी स्थापन करावा, अशी तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. ही सर्व माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना दि.१६.०६.२०२५ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी दि.१७.०६.२०२५ रोजी माहिती स्वीकारुन सदरील माहिती प्राप्त झाली व समाधान झाले आहे असे नमूद करुन दिनांकीत स्वाक्षरी केलेली आहे. ती पोहच आयोगास सादर केले.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दि.१७.०६.२०२५ रोजी दिलेली पोहच विचारात घेता, अपिलार्थी यांचे विचाराधिन व्दितीय अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8022 दिनांक : 15/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०२२१/२०२४**
**बोर्ड क्र.६२**

श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, — अपिलार्थी
रा. गांधी मार्केट स्टेशन रोड, परळी वैजनाथ,
ता. परळी वैजनाथ, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — :उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, परळी वैजनाथ, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद परळी वैजनाथ, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारीउपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.१०.२०२३ | दि.०१ जानेवारी १९४८ ते आजतागायत या कालावधीतील राजीव गांधी नगर अमर मैदान येथील झोपडपट्टी (४९९) च्या जुने फेरफार व हस्तलिखीत सात बारा व नविन फेरफार सातबारा देण्यात याव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहितीउपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की,अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.३०.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये पोस्टाने माहिती पाठविलेली आहे. तथापि अपिलार्थी त्या पत्यावर राहत नसल्यामुळे ते पाकिट परत आलेले आहे. आज रोजी सोबत आणलेले आहे.

सुनावणीदरम्यान अपिलार्थीस पुन्हा एकदा उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांनी ती माहिती स्वीकारली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी अपिलार्थी यांना माहिती दिलेली आहे. तथापि सुनावणीदरम्यानही पुन्हा एकदा माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी ती माहिती स्वीकारली, या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र.- 8023 दिनांक :- 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८३७/२०२४**
**बोर्ड क्र.६३**

श्री. मल्लिकार्जून शिवलिंग भाईकट्टी, — अपिलार्थी
रा. हरिद्वार अपार्टमेंट, तिसरा मजला,
लगसकर बिल्डींगच्या समोर, जुना औसा रोड, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, परळी वैजीनाथ, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, परळी वैजीनाथ, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.११.२०२४ | श्रीनाथ इजिनिअर्स लातूर यांना आपल्या कार्यालयाकडून देण्यात आलेले कार्यारंभ आदेश, करारनामे, बँक गॅरंटर्स इ. दस्ताऐवजाच्या १.०४.२०१८ ते आजपर्यंतच्या छायांकित प्रती मिळाव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना पोस्टाने माहिती पाठविलेली आहे. तथापि अपिलार्थी त्या पत्यावर राहत नसल्यामुळे पोस्टाचे पाकिट परत आलेले आहे. आज सोबत आणलेले होते. तथापि अपिलार्थी आजही अनुपस्थित आहेत. तदनंतर प्रथम अपिलाची नोटीसही पाठविलेली होती ती नोटीसही परत आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अपिलार्थीस पोस्टाद्वारे माहिती पाठविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी विहित पत्यावर अपिलार्थी राहत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8024 दिनांक :- 15/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६३२०/२०२४**
**बोर्ड क्र.६४**

श्री. बद्रोदीन बाबुमियॉ शेख,
रा. जुना रेल्वे स्टेशन परळी वैजीनाथ,
ता. परळी वैजीनाथ, जि. बीड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगर परिषद कार्यालय, परळी वैजीनाथ, जि. बीड : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद परळी वैजीनाथ, जि. बीड : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.१०.०२३ | कन्ट्रक्शन मार्फत नगर उत्खननाच्या नालीचे एम बी रेकॉर्ड देण्यात यावे आझाद नगर मेन रोड आझाद नगर व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचे प्रथम अपील कार्यालयात प्राप्त झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये,

माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, परळी वैजीनाथ, जि. बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली अपिलार्थी यांना माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद परळी वैजीनाथ, जि. बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8013 दिनांक :- 15/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७६३०/२०२४**
**बोर्ड क्र.६५**

श्री. वैजीनाथ पिता नारायण माने, — अपिलार्थी
रा. सावतामाळी चौक, परळी वै., जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, परळी वैजीनाथ, जि. बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद परळी वैजीनाथ, जि. बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०४.२०२४ | महाराष्ट्र शासनाच्याअद्यायवत नियमनुसार परळी नगर परिषद हद्दीतील गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यासाठी दि.१६.०१.२०२३ ते आजपर्यंत प्लॉट धारकाकडून घेतलेली रक्कम न.प. च्या कुठल्या हेडवर जमा करण्यात आली व सदरील दिनांकापासून आज पर्यंत किती रक्कम जमा करण्यात आली याची सविस्तर माहिती देण्यात यावी व इतर तीन मुद्याबाबत.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२५.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे. तथापि माहितीचा

एक संच आजही सोबत आणलेला आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पाठविलेली आहे. तथापि त्यांना मिळालेली नसल्यामुळे आज रोजी सुनावणीदरम्यान पुन्हा एकदा माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती माहिती स्वीकारली. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचानिर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8014 दिनांक :- 15/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७६५९/२०२४**
**बोर्ड क्र.६६**

श्री. सनी विष्णु वाघमारे, — अपिलार्थी
रा. सहयोग नगर पुर्व बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.०२.२०२४ | सन २०२२-२०२३ या कालावधीतील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे वस्ती सुधारणा योजना व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरीस्थान या योजनेअंतर्गत बीड शहरात चालू असलेल्या कामाचे टेंडर कोणत्या कंन्स्ट्रशन देण्यात आले सदरील कंन्ट्रशनचे लायसन्सची. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती

अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापि दि.०२.०७.२०२५ रोजी पुन्हा एकदा पाठविण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१७.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. यास्तव अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिल प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, नगर परिषद कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8015 दिनांक : 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७६०२/२०२४ १९१३ व १९१४/२०२४**
**बोर्ड क्र.६७ ते ६९**

श्री. पठाण मुकरमजान गुलमोहम्मद खान, — अपिलार्थी
रा. हत्तीखाना गल्ली आष्टी, ता. आष्टी, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
रोखपाल विभाग, नगर परिषद कार्यालय, बीड
(बोर्ड अ.क्र.६७)

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

३ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, बीड (बोर्ड अ.क्र.६८)

४ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

५ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, बीड (बोर्ड अ.क्र.६९)

६ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१६.०७.२०२४ व १३.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.१०.२०२३ | दि.०१.०१.२०२३ ते दि.१६.१०.२०२३ पर्यंत या कालावधीतील गुंठेवारी संबंधित |

| | |
|---|---|
| | भरलेल्या रक्कमेची माहिती मिळणे |
| ०६.१०.२०२३ | सन २०२० ते २०२३ या कालावधीतील न.प. विधी तंज्ञ बाबत व केसबाबतची माहिती |
| ३१.०८.२०२३ | सन २०२० ते २०२३ या कालावधीतील अग्णिशमक दल या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची एकूण २२ मुद्याबाबतची माहिती मागितलेली आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अर्धवट मिळालेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२२.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयीन रोख व्यवहाराची पावत्याची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. उर्वरीत माहिती डाटा क्रप्ट झालेला असल्यामुळे माहिती देता येत नाही असे कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२१.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसूनयेत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०५.२०२४ व दि. १२.१२.२०२३ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी वरील तिन्ही अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तिन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8016 दिनांक : 15/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १९४६/२०२४**
**बोर्ड क्र.७०**

श्री. हरिश्चंद्र मारुतीराव विद्यागर, — अपिलार्थी
रा. तक्षशिला नगर, धानोरा रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
रमाई आवास योजना बांधकाम विभाग,
नगर परिषद कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.१२.२०२३ | सन २०१६-२०१७ मध्ये या कालावधीतत घरकुल क्र.३४८/२०१६-२०१७ बाबत श्रीमती पुष्पा जयप्रकाश सोनवणे, पंचशिल नजर घर न.१-३-५६ वर्षे मंजूर घरकुमाची संचिका झेरॉक्स सत्यप्रत मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मी मागीतलेली माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.०९.२०२४रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा रमाई आवास योजना बांधकाम विभाग,नगर परिषद कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8025 दिनांक : 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४०५०/२०२४**
**बोर्ड क्र.७१**

श्री. बलवंत रंगनाथ बोटुळे, — अपिलार्थी
रा. बालेपीर नगर रोड, गोरे वस्ती, बांगरनाला, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
आस्थापना विभाग, नगर परिषद कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०१.२०२४ | मी बलवंत रंगनाथ बोटुळे पद क्षेत्र कार्यकर्ता मलेरीया विभाग यामधून सेवा निवृत्त झालो असून मला २४ वर्षे कालबध्द पदोन्नती व ७ व्या वेतन आयोगाची प्रत हवी आहे. ही प्रत मी एस व्ही धाचेर यांच्याकडे मागीतली असता त्यांनी देण्यास नकार दिला व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी मला अद्यापपर्यंत कोणतीच माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपुर्ण माहिती प्राप्त झाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि०४.०९.२०२४ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, नगर परिषद कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8026 दिनांक : 15/07/2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४९४७,४९४८,४९४९,
व ४९५२/२०२४ एकूण ०४**

**बोर्ड क्र.७३ ते ७६**

श्री. शेख शाहेर झाकीर अहमद, — अपिलार्थी
रा. नेकनूर, ता व जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
नगर परिषद कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये एकूण चार द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, त्यांचे विधिज्ञ व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०१.२०२४ | सन २०२ ते २०२४ या कालावधीत आपल्या कार्यालयामार्फत शहर बीड येथील नगर परिषद हद्दीतील २०२२-२३ मध्ये करण्यात आलेले १२ कामांसाठी **S S Construction Beed** ला किती निधी वाटप करण्यात आला याबाबत सविस्तर संपूर्ण कागदोपत्री व इतर दोन मुद्याबाबत ... |
| २५.०१.२०२४ | सन २०२२ ते २०२४ या कालावधीतील आपल्या कार्यालयामार्फत शहर बीड येथील |

| | |
|---|---|
| | नगर परिषद हद्दीतील बीड नगर परिषद हद्दीतील लोक शाहीर अण्णाभाऊ साठे नगरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत विविध प्रभागात सी सी रास्ता व नाली बांधकाम (एकूण ३२ कामे) ता.बीड करिता सन २०२३-२४ मध्ये करण्यात आलेले ३२ कामांचे Estimate ईस्टिमेटची सविस्तर कागदोपत्री माहिती छायांकित प्रमाणीत प्रत मध्ये देण्यात यावी व इतर दोन मुद्याबाबत.. |
| २५.०१.२०२४ | सन २०२२ ते २०२४ या कालावधीतील आपल्या कार्यालयामार्फत शहर बीड येथील नगर परिषद हद्दीतील बीड नगर परिषद हद्दीतील लोक शहीर अण्णाभाऊसाठे नगारी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत विविध प्रभागात सी सी रास्ता व नाली बांधकाम (एकूण ३२ कामे) ता. बीड करिता सन २०२३-२४ मध्ये करण्यात आलेले ३२ कामांसाठी **S S Construction Beed** ला किती निधी वाटप करण्यात आली याबाबत सविस्तर संपूर्ण कागदोपत्री माहिती छायांकित प्रमाणित प्रत मध्ये देण्यात यावी व इतर दोन मुद्याची माहिती.. |
| २५.०१.२०२४ | सन २०२१ ते २०२४ या कालावधीतील आपल्या कार्यालयामार्फत शहर बीड येथील नगर परिषद हद्दीतील महाराष्ट्र सवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) करिता सन २०२१-२०२२ व २०२२-२३ मध्ये करण्यात आलेले १२ कामांचे Estimate ईस्टिमेटची सविस्तर कागदोपत्री माहिती छायांकित प्रमाणित प्रत मध्ये देण्यात यावी व इतर दोन मुद्याबाबत.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे विधीज्ञ यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन माहिती देण्याचे आदेशीत दिलेले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत नाही. मी सध्या नवीन आहे. संचिकेचा शोध घेऊन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मुदतीत माहिती व प्रतिसाद दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तु प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वरील चारही प्रकरणात दि.०४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे, तो निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या चारही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे चार द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8027 दिनांक : 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५००२/२०२४**
**बोर्ड क्र.७७**

ॲड. सिध्दार्थ मधुकरराव वारे, — अपिलार्थी

द्वारा- **C / 0** ॲड. अरुण एस. शेजवळ, बी. एच.१/८३, एन-२, ठाकरेनगर, भारत पेट्रोल पंपच्या पाठीमागे, सिडको, ता.जि. छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
नगर परिषद कार्यालय, बीड — :उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड — :उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०२.२०२४ | दि.०१.१२.२०२२ ते दि.१५.१२.२०२२ या कालावधीतील नगर परिषद बीड पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी व व्हॉल्व्हमन यांच्या मार्फत वरील कालावधी मध्ये एम.आय.डी.सी. परीसर तिरुमला ऑईल मिल परीसर, अयोगध्यानगर, पांडूरंगनगर या भागात करण्यात आलेल्या पाणी पुरवठाचे वेळेस असलेले नोंदीचे रजिस्टर आणि पाणी पुरवठा डयुटी रजिस्टरचे/ नांदेवहीचे माहिती प्रती देण्यात याव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना दि.२६.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन पोहच दिलेली आहे. ती पोहच आयोगाच्या पटलावर सादर केली.

आज रोजी सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणतीही माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या २१.०५.२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२६.०६.२०२४ रोजी माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्वीकारुन माहिती मिळाल्याची दिनांकीत पोहच दिलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलान नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र शा ३

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 8028 दिनांक : 15/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५२११/२०२४**
**बोर्ड क्र.७८**

| | |
|---|---|
| श्रीशेखनिजामजैनोद्दिन्,<br>रा.जयहिंद सॉमिल सुभाषरोड,बीड | अपिलार्थी |
| **विरुध्द** | |
| १ जनमाहितीअधिकारीतथा<br>लेखापाल व लेखापरिक्षक,नगरपरिषद कार्यालय,बीड | उत्तरवादीक्र[redacted] |
| २ प्रथम अपिलीय अधिकारीतथा<br>मुख्याधिकारी,नगरपरिषद,बीड | उत्तरवादीक्र[redacted] |

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थीयांनी दि[redacted]रोजी राज्य माहिती आयोग,खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,[redacted] कलम[redacted]अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले.तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड(वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे.सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणेसादर करण्याचीसंधीउपलब्धकरुनदेण्यातआलेलीआहे.त्यानुसारआजरोजीसुनावणीसाठीजनमाहितीअधिकारी उपस्थित आहेत.तसेचप्रथम अपिलीय अधिकारीयांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.अपिलार्थीअनुपस्थित आहेत.
अपिलार्थीयांनीजोडपत्र'अ'नुसार जन माहिती अधिकारीयांचेकडे कलम[redacted]अन्वये खालीलप्रमाणेमाहितीमागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| [redacted] | बीड नगर परिषदेतील एकूण सर्व विभागातील झालेल्या वेगवेगळया कामांच्या देयकांचे धनादेशाच्या अनुषंगाने दि[redacted]दि[redacted]पर्यंत वाटपझालेल्या धनादेश वाटपरजिष्टरच्याप्रती |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीसमाहितीउपलब्धकरुनदिल्याचेदिसूनयेतनाही.मीसध्यानवीनआहे.रुजूहोऊनमलादोनमहिनेझालेले आहेत. काही कालावधी दिल्यास अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.
आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि[redacted]जी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे,असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुतप्रकरणातयुक्तिवादव उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की,अपिलार्थीयांना माहिती मिळाल्याचे दिसूनयेतनाही.**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०३.२०२४ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थीयांनीद्वितीयअपिलात

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे,असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुतप्रकरणातयुक्तिवादवउपलब्धअभिलेखावरुनअसेदिसूनयेतेकी,अपिलार्थीयांनामाहितीमिळाल्याचे दिसूनयेतनाहीप्रथम **अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०३.२०२४ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थीयांनीद्वितीयअपिलात नमूद केलेल्याप्रयोजनाततथ्यांशदिसूनयेतआहे.

अतःआयोगखालीलप्रमाणेआदेशपारितकरतआहे.

**आदेश**

१. वर्तमानजनमाहितीअधिकारीतथालेखापालवलेखापरिक्षक,नगरपरिषद,बीडयांनीअपिलार्थीयांच्याजोडपत्रअ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम७नुसार विनामूल्य उपलब्धकरुनद्यावी.

२. मुख्याधिकारी,नगर परिषद,बीडयांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश ईदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8029 दिनांक : 15/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६२५८/२०२४**
**बोर्ड क्र.८१**

श्री. भूषण चांगदेव कांडेकर, — अपिलार्थी
रा. माळी वेस, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.१
स्थापत्य अभियंता, नगर परिषद, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — :उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०१.२०२४ | बीड येथील नगर परिषद हद्दीतील शाहुनगर येथे तांदळे पांडूरंग सूर्यभान यांचे घर ते राजाभाऊ घोडके (पांडूरंग रेसिडेन्सी) ते श्रीपात सु. जोशी यांचे उपले (आरोही लाईट) ते चंपालाल गणपतराव यांचे घरापर्यंत सिमेंट क्रॉंक्रीट रस्ता व नाली बांधकाम करणे ते काम नागरी दलिल वस्ती सुधार योजने मधून झाले आहे, त्याची प्रशासकीय मान्यता दि.३१.१२.२०२० व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, लेखा परिक्षण सुरु होते त्यामुळे

माहिती देण्यास विलंब झाला असून सदर अपिलार्थीचे वेगवेगळी माहितीसाठी अनेक प्रकारचे अनेक अर्ज असल्याकारणाने माहिती देण्यास विलंब झालेला आहे. काही कालावधी दिल्यास अपिलार्थीस माहिती देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, निर्णय न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा स्थापत्य अभियंता, नगर परिषद, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8030 दिनांक : 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६८५६/२०२४**
**बोर्ड क्र.८२ व ८३**

श्री. सय्यद आबेद अली सय्यद अली, — अपिलार्थी
रा. नवी भाजी मंडळ, अख्तरी मस्जीद जवळ, ता.जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कर अधिकारी व प्रशासकीय अधिकारी,
नगर परिषद कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०१.२०२४ | बीड नगर परिषद कार्यालयाच्या अधिनस्त/ अधिपत्याखालील असलेली मोकळी जागा,ओपन स्पेस तसेच मोकळया जागेवर व्यवसायासाठी तयार केलेले दुकाने/गाडे दि.२२.१२.२००६ पासून ते माहिती मिळपर्यंत या कार्यालयामध्ये एकूण ज्यांना-ज्यांना, ओपन स्पेस मोकळया जागेवर व्यवसायाठी तयार केलेले दुकान/ गाडे तयार करुन किंवा पूर्वी तयार असलेली दुकान देण्यात आली आहेत. त्या सर्व लोकांच्या/अर्जदारांच्या नावांच्या याद्यासह सर्व पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रतीसह सदरील प्रकरणातील ओपन स्पेस दुकाने/ गाडे देण्यासाठी तयार करण्यात आलेली पूर्ण फाईलच्या/संचीकेच्या/प्रस्तावाच्या छायांकित प्रती प्रमाणीत करुन मला देण्यात याव्यात. |
| २९.०१.२०२४ | मा. दिवानी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) बीड यांनी यांच्याकडील दिवानी दावा क्र.६७८/२००० दि.२२.१२.२००६ रोजी पारीत केलेला आदेश आणि प्रस्तुत प्रकरणातील न्यायालयीन आदेशान्वये मी अर्जदाराने ०१. दि.१७.०७.२००७ रोजी सादर केलेले अर्ज ०२. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे पत्र क्रमांक |

| | |
|---|---|
| | ०८/जीबी/डेस्क-१/कावि २३५४ दि.२३.०९.२००८ व ०३.मा. जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांचे पत्र जा.क्र.२०२३/जिंबी/डेस्क-१/नपाप्र/कावि-दि.०४.०८.२०२३ या सदरील प्रस्तुत प्रकरणामध्ये मा. दिवानी न्यायालयाच्या आदेशावर व सर्व पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने आपल्या बीड नगर परिषद कार्यालयाद्वारे जि नियमानुसार कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचे संबंधित कार्यालयास केलेले सर्व पत्रव्यवहाराच्या छायांकित प्रतीसह सदरिल प्रकरणाची तयार करण्यात आलेली पुर्ण फाईलच्या/संचीकेच्या/ प्रस्तावाच्या छायांकित प्रती प्रमाणीत करुन मलादेण्यात याव्यात. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की,ऑफिस स्थलांतर झाल्यामुळे काही नस्ती आढळून येत नाहीत. काही कालावधी दिल्यास अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोन्ही प्रथम अपिलावर दि.०४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अद्यापपर्यंत दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी अपिलार्थी यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही. अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कर अधिकारी व प्रशासकीय अधिकारी, नगर परिषद कार्यालय, बीडयांनी अपिलार्थी यांच्या दोन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहिती आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. मुख्याधिकारी,नगर परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे दोन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8031 दिनांक : 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ९३७२/२०२४**
**बोर्ड क्र.८४**

श्री. विक्रम कोंडिबा मोमीन, — अपिलार्थी
रा. आनंदवाडी पो.बीड जालना रोड, बीड-४३११२२

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.१०.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०३.२०२१ | दि.१०.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयास अनुसरुन सन २०१८ ते दि.३१.१२.२०२३ अखेर दिव्यांग व्यक्तीच्या ५ टक्के निधी वितरणाबाबत तपशिलवार माहिती अपेक्षित आहे. त्यात दिव्यांग व्यक्तीचे नाव पुर्ण पत्ता, दिव्यांग व्यक्तीचा प्रकार, प्रमाण पत्राचा क्रमांक, प्रमाणपत्र प्रत व निधी वितरण मंजूरी आदेशासह प्रमाणित प्रती अपेक्षित वर्ष निहाय. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या

माहिती अर्जाच्या अनुषंगाने विस्तृत मोठी माहिती असल्यामुळे देता आलेली नाही. आज रोजी माहिती संकलीत करुन सोबत आणलेली आहे. आपल्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती आजपर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती संकलीत करुन सोबत आणलेली होती. अपिलार्थी यांना सुनावणीदरम्यान माहिती घेण्याचे मान्य केले आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.---8032--- दिनांक :-15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०९०७/२०२४**
**बोर्ड क्र.८५**

श्री. मोरे भैय्यासाहेब नारायण, — अपिलार्थी
मु. पो. धानोरा रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
बांधकाम विभाग, नगर परिषद कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१९.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे वतीने दोन प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०५.२०२४ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियंता (राज्यस्तर) दुसरा टप्पा मधील मंजूर काम क्र.१५ अंकुश नगर ते पाण्याची टाकी सिमेंट क्रॉक्रेट रस्ता व नाली बांकाम करणे या कामाची लेखी स्वरुपात माहिती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी मला अद्यापपर्यंत माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. तसेच न. प. लेखा विभागाचे लेखा परिक्षण सुरु होते. त्यामुळे माहिती देण्यास विलंब झालेला आहे. काही कालावधी दिल्यास अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना परिपुर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, नगर परिषद, बीड यांनी अपिलार्थीस १५ दिवसात माहिती दयावी, असा निर्णय दिलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग, नगर परिषद कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 980000 ------------------------ दिनांक :- 14/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ०६५३/२०२४**
**बोर्ड क्र.८६**

श्री.राजु कोंडीबा घोडके, अपिलार्थी
रा. डोणगाव ता. जाफ्राबाद, जि. जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख कृषि विज्ञान केंद्र खरपुरी, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सचिव मराठवाडा शेती सहाय मंडळ, जालना

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०१.२०२४ | सन २०१२ ते २०२३ या कालावधीती कृषी विज्ञान केंद्र खरपुडी जाजलना, ता.जि. जालना येथील कृषी विज्ञान केंद्र शासनाकडून वरील कालावधीत किती निधी प्राप्त झ ाला व तो निधी कोणकोणत्या बाबीवर खर्च करण्यात आला त्याचे जी पी आर एस फोटो पावती व प्राप्त झालेल्या निधीची बँक पासबुक झेरॉक्स याची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, मराठवाडा शेती सहाय्यक मंडळ, जालना या अशासकीय संस्थेमार्फत चालविला जातो. कृषि विज्ञान केंद्राचे सर्व शास्त्रज्ञ व कर्मचारी हे अशासकीय संथेच्या आस्थापनेवर तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत आहेत. या मंडळाला शासनाचे कोणतही अनुदान प्राप्त होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेला निर्णय योग्य दिसून येत आहे. **प्रथम अपिलीय अधिकारी दि.१०.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, अपील खारीज करण्यात येत आहे, असा निर्णय दिलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपिल निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 7999 दिनांक : 14/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११५१/२०२४**
**बोर्ड क्र.८७**

श्री. विलास आण्णासाहेब जाधव, — अपिलार्थी
रा. सेलापुरी, ता. माजलगांव, जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
समाज कलयाण विभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण विभाग, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०८.२०२३ | २०१७ ते २०२३ या कालावधीतील कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण मंजूर झालेले प्रकरणे निवड यादी मिळणेबाबत व इतर दोन मुद्याबाबत.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी एका माहितीच्या अर्जामध्ये एका विषयाची माहिती मागणे अपेक्षित आहे. तथापि अपिलार्थी यांनी तीन विषयाची माहिती मागितल्यामुळे अपिलार्थी यांना दि.१५.०९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सविस्तरपणे कळविण्यात आलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचे प्रथम अपिल आमच्या कार्यालयाशी संबंधी नसल्यामुळे प्रथम अपिलावर सुनावणी घेण्यात आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की अपिलार्थी यांनी एकाच अर्जात तीन वेळावेगळया विषयाची माहितीची मागणी केलेली आहे. स्वतंत्र प्राधिकरणाकडे स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने अपिलार्थी यांना दि.१५.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१५.०१.२०२३ रोजी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व द्वितीय अपिल प्रयोजनात तथ्यांश दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8033 दिनांक : 15/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४४३७/२०२४
बोर्ड क्र.८८

श्री. एस. एस. कर्णेवार, — अपिलार्थी
रा. ४६ चंद्रश्रध्दा, विष्णूनगर वसमत रोड, परभणी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
समाज कल्याण कार्यालय,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नगर रोड,
बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन नगर रोड, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळांवरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०८.२०२३ | श्रीम. विजया लक्ष्मी तुगेनवार सह शिक्षीका संत विठ्ठलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, प्राथमिक शाळा आनंदनगर अंबाजोगाई , जि बीड येथे खत्री या जमातीच्या खोटया प्रमाणपत्रावर नोकरीत असून त्यांनी त्यांचे प्रमाणपत्र पडताळणीसाठी अनु. जमाती प्र. पत्र तपासणी औरंगाबाद विरुध्द येथे दि.२६.०९.२०१३ रोजी सादर केले आहे. त्याचे प्रमाणपत्र तपासणी आजपावेतो प्रलंबीत असून याबाबत आपले कार्यालयाने किंवा सदरील संस्थेने अनु. जमाती प्रमाणपत्र तपासणी कार्यालयाने औरंगाबाद किनवट येथे पाठपुरावा केल्याचे पत्रव्यवहार प्रती साक्षांकित करुन मिळणेबाबत व इतर.. |

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी, मागणी केलेली माहिती उघड केल्यामुळे साध्य होणाऱ्या व्यापक जनहिताच्या समर्थनार्थ काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

आदेश

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8034 दिनांक : 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४७५७, ४७५८ व ४७५९/२०२४-३**
**बोर्ड क्र.८९ व ९०**

श्री. मनोज विठ्ठलराव आंधळे, — अपिलार्थी
रा. वडवणी, ता. वडवणी, जि. बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण विभाग, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय
दुध डेअरीच्या पाठीमागे खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.१२.२०२३ | मोहटादेवी सेवाभावी संस्था संचलित शाहु फुले आंबेडकर अनुयायी निवासी शाळा पिंपळा, रुई, मा. शाळेच्या संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची यादी व त्यांना मिळालेल्या नियुक्ती पत्राची एक प्रत मिळणेबाबत. सदरील माहिती ही संस्थेच्या निवासी शाळेच्या स्थापनेपासून ते आज दि.२०.१२.२०२३ पर्यंत असणे आवश्यक आहे. |
| २०.१२.२०२३ | मोहटादेवी सेवाभावी संस्था पिंपळा, रुई संचलित शाहुल फुले आंबेडकर अनुसूचीत जरी निवासी शाळा पिंपळा, रुई या शाळेतील शासनाने नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची यादी व त्यांच्या नियुक्ती आदेशाची प्रत मिळणेबाबत सदरील माहिती ही |

| | |
|---|---|
| | शाळेच्या स्थापनेपासून ते आज पर्यंत दि.२०.१२.२०२३ या कालावधतीत असणे आवश्यक आहे. |
| २०.१२.२०२३ | दि.०१.०६.२०२२ ते २०.१२.२०२३ मोहटादेवी सेवाभावी संस्था (रुई) संचलित शाहु फुले आंबेडकर अनुसुचित जाती निवासी शाळा पिंपळा (रुई) या शाळेच्या स्थलांतराच्या प्रस्तावाची सध्यस्थिती काय आहे याची पुर्ण अहवाल आवश्यक आहे. सदरील अहवाल दि.०१.०६.२०२२ ते २०.१२.२०२३ या कालावधीचा असणे आवश्यक आहे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशीत करुनही जन माहिती अधिकारी यांनी मला अद्यापपर्यंम माहिती दिलेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलाथी यांच्या माहितीचा अर्ज शाळेशी संबंधीत असल्यामुळे दि.०९.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, मुख्याध्यापक, मोहटादेवी सेवाभावी संस्था, पिंपळा रुई, ता. वडवणी जि. बीड संचलित अनु. जाती निवासी शाळा पिंपळाई येथे वर्ग करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळवून, त्याची प्रत अपिलार्थीस पाठविलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.०२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलीच नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.०२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन मागितलेली पुर्ण माहिती ४ दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेशीत केल्याचे दिसून येत आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही. अपिलार्थी यांच्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, बीड यांनी,अपिलार्थी यांच्या तीन्ही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय दुध डेअरीच्या पाठीमागे खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे तीन्ही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8003 दिनांक :- 14/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६२६७/२०२४**
**बोर्ड क्र.९२**

श्री. राजाभाऊ शंकरराव जगतकर, — अपिलार्थी
रा. जगतकर गल्ली, भिमनगर, परळी, परळी वै.जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
जिल्हा समाज कल्याण कार्यालय,
आंबेडकर भवन दुसरा मजला नगर रोड, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा समाज कल्याण कार्यालय,
आंबेडकर भवन दुसरा मजला नगर रोड, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०६.२०२४रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०२.२०२४ | दि.०१.०१.१९९४ ते ३१.०१.२०२४ या कालावधीत परळी येथे राजमाता जिजाबाई मुलींचे वस्तीगृह भिमनगर, येथे चालू असून वरिल कालावधीमध्ये या वस्तीगृहाचे शासना तर्फे इमारत वर्षनिहाय किती भाडे दिले आहे. त्याची वर्ष निहाय आकडेवारी तसेच वस्तीगृह चालक व इमारत मालक यांच्या भाडेकराराची वरील कालावधीसाठी असलेली साक्षांकित प्रत देण्यात यावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण कार्यालय, आंबेडकर भवन दुसरा मजला नगर रोड, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा समाज कल्याण कार्यालय, आंबेडकर भवन दुसरा मजला नगर रोड, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8035 दिनांक : 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६३२/२०२४**
**बोर्ड क्र.९३**

श्री. महोबत खान युनुस खान, अपिलार्थी
रा. जुना बाजार हाफीज गल्ली बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
मिल्लीया माध्यमिक शाळा मुलींची बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक, मिल्लीया माध्यमिक शाळा मुलींची, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०४.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच, आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०२.२०२३ | ईस्मॉन सिध्दीकी गाझी सिध्दीकी रा. शिक्षक मिल्लीया हायस्कूल बीड, हेडमास्टर व इतर दोन मुद्याची माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्रयस्थांची माहिती मागितलेली आहे. त्रयस्थ व्यक्तिची विचारणा केली असता त्यांनी माहिती देण्यास नकार दिलेला असल्यामुळे तसेच अपिलार्थी यांना दि.२३.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम ८ पोटकलम (अ) मधील तरतुदीनुसार माहिती देय होणार नाही असे कळविलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी हे दि.०५.०२.२०२४ रोजी सुनावणीस अनुपस्थित असल्यामुळे सुनावणी घेण्यात आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, आजपर्यंत माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थांची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२३.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सविस्तरपणे कळविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी, मागणी केलेली माहिती उघड केल्यामुळे साध्य होणाऱ्या व्यापक जनहिताच्या समर्थनार्थ काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8017 दिनांक :- 15/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६८७६/२०२४ व ६८७७/२०२४**
**बोर्ड क्र.९४ व ९५**

श्री. शेख वजीर शेख नजीर, — अपिलार्थी
रा. जुना रेल्वे स्टेशन, परळी वै.जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मिल्लीया माध्यमिक शाळा मुलींची, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
मिल्लीया माध्यमिक शाळा मुलींची, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०२.२०२४ | फहमीदा सय्यद शिक्षकांचे २०१५ ते २९.०२.२०२४ पर्यंत हजेरी पट, २०१५ ते २९.०२.२०२४ पर्यंत मंजूर सी.एल., २०१५ ते २९.०२.२०२४ पर्यंत उचलेले पगारपत्र व २०१५ ते २९.०२.२०२४ पर्यंत विदेशी यात्राचे तपशील. |
| ११.०३.२०२४ | सन २०२० ते ११.०३.२०२४ पर्यंत आपल्या शाळेने शिक्षणाधिकारी, मा. जि. प.बीड यांच्याकडे शाळा/ संस्थे तर्फे देण्यात आलेल्या नियुक्ती पत्र व नियुक्तीसाठी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या जाहिरातीची सत्यप्रत देण्यात यावे. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी

त्रयस्थांची वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितलेली होती. त्यामुळे त्रयस्थ पक्षांना विचारणा केली असता त्रयस्थांनी माहिती उघड करण्यास नकार दिलेला आहे. तयामुळे तसे अपिलार्थी यांना ही माहिती देता येत नाही असे दि.२६.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यत आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांन त्रयस्थांची माहिती मागितल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.२६.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सविस्तरपणे कळविल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांना विचारणा केली असता ते याबाबत कोणतेही समर्थणीय कारण आयोगास देऊ शकले नाही. सारांशाने, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे दोन द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8018 दिनांक : 15/07/2025

(सु. बोर्ड अ.क्र.९४ द्वितीय अपील क्रमांक ६८७६/२०२४ २/२)

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६१२८/२०२४**
**बोर्ड क्र.९६**

ॲड. एस.डी.सपकाळ, अपिलार्थी
रा. घर नं.१-८-३० कारंजा रोड, बीड, ता.जि. बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय,
नामलगांव फाटा जालना रोड, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, नामलगांव फाटा
जालना रोड, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केलेली नाही)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.१२.२०२३ | सन २०२३ या कालावधीतील<br>कॉर्नर स्टोन ऑटोमोबाईल्स (मंहिद्र डिलर) बार्शी रोड, बार्शी नाका, बीड यांचे संबंधीत माहिती व इतर.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अर्धवट दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, मी दोन महिन्यापूर्वी रुजू झालो आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०८.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती

उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१३.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, निर्णयाप्रमाणे विस्तृत माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना अर्धवट माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१३.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च: त्याविषयी जास्त विस्तृत रितीने माहिती अपिलार्थीस दयावे, असा निर्णय दिलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय,नामलगांव फाटा जालना रोड, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, नामलगांव फाटा जालना रोड, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 8007 दिनांक:- 14/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक -९९०९, ९९१०,
१०८५८/२०२४-४**

**बोर्ड क्र.९७ ते ९९**

श्री. प्रशांत जयमल्हार बिडवई, — अपिलार्थी
रा. गणेश ईस्टेट एजन्सी चाळ, रुम नं.२, गांधीनगर, नियर साई सागर हॉटेल, मांजली रोड, वैशाली टॉकीजच्या मागे, बदलापूर (बद्नापूर), ता. अंबरनाथ, जि. ठाणे-४२१ ५०३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपिले दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केलेली नाही)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०७.२०२४ | २२.०७.२०२४ या कालावधीतील एमडीएल नं. एमएच २३ २०११००८६८१, डेथ ऑफ बर्थ ०४.०८.१९८७ डेथ ऑफ इश्यू ११.०८.२०२२ डेथ ऑफ ॲक्सिडंट १७.१०.२०२११ ड्रायव्हरचे नाव गोकुळ अंबादास नाईकनवरे हया ड्रायव्हिंग लायसन्सची माहिती अपघाताच्या काळातील दयावी. |
| १५.०७.२०२४ | दि.१५.०७.२०२४ या कालावधीतील एमडीएल नं. एमएच २३ २०२२००११४७७ डेथ ऑफ बर्थ ०१.०१.१९८८, डेथ ऑफ इश्यू ११-०८-२०२२ डेथ ऑफ ॲक्सिडंट |

| | |
|---|---|
| | २०.०५.२०२३ हसर ड्रायव्हिंग लायसन्सची माहिती दयावी, परभणी एमएसीटी नं.३४०/२०२३ ड्रायव्हरचे नाव धनराज रामकिसन खंडारे. |
| ०९.०९.२०२४ | दि.०९.०९.२०२४ या कालावधीतील गाडी नं एमएच ४४ डी ५६२० अपघात दिनांक ३१.०१.२०१८ गाडी मालक श्री.मानिक बाप्पाजी बदे, हया गाडीची माहिती अपघाताच्या काळातील माहिती दयावी. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीचा अर्ज व प्रथम अपिल कार्यालयाकडे न करता थेट द्वितीय अपील आयोगाकडे दाखल केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचे प्रथम अपिल कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी द्वितीय अपिल दाखल करताना सोबत जोडलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जोडपत्र 'अ' व प्रथम अपिलावर कार्यालयाचा शिक्का किंवा पोस्टाची पावती सोबत जोडल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अशा द्वितीय अपिलावर कार्यवाही करणे योग्य नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादात तथ्यांश दिसून येत आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांचे तीन्ही द्वितीय अपिले फेटाळण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांचे तीन द्वितीय अपिले फेटाळण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 8002 दिनांक : 19/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०५७६/२०२४**
**बोर्ड क्र. १००**

श्री. मोहम्मद याकुब मोहम्मद इब्राहिम, — अपिलार्थी
रा. कादरी दवाखाना, नुर मजिद जवळ, बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वरिष्ठ लिपीक,
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड

**(सुनावणी दिनांक ०३.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.१२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपिलें दाखल केलेले आहेत. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. (तथापि जन माहिती अधिकारी यांनी रोजनाम्यावर स्वाक्षरी केलेली नाही)

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०३.२०२४ | सन २०१४ ते २०१७ या कालावधीतील वाहन क्र एम एच-२३-एन-६०५० (ar) वाहन क्र.एम एच-२३ एन-५६६१ (ar) या दोन्ही वाहनांचे आर. सी र्पोकुलरची माहिती मिळणेबाबत |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मला अर्धवट दिलेली आहे. माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस दि.२८.०३२०२४ व १६.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र.१ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, पुर्ण माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना पुर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही. **प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च: त्याविषयी माहिती अपिलकर्त्यास दयावे, अस निर्णय दिलेला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. या निर्णयात बदल करण्याची आयोगास आवश्यकता दिसून येत नाही.** अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

अत: आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक,उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, बीड यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

**जा.क्र.**- 8004 - **दिनांक :**- 14/07/2025